(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XV / Issue – II ISSN 2277-8063

# "आधुनिक राजकीय संकल्पना: बहुसंस्कृतीवाद"

**प्रा.विशाल कांबळे** विभागप्रमुख, सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, डि.के.ए.एस.सी. कालेज, इचलकरंजी

---

**प्रस्तावना :-**

राज्यशास्त्राच्या अभ्यासामध्ये आधुनिक राजकीय संकल्पना, नवीन संकल्पना सिध्दांत रुपाने अस्तित्वात आले आहेत. यामध्ये उत्तर आधुनिकतावाद, स्त्रीवाद, पर्यावरणवाद, बहुसंस्कृतीवाद व समुदायवाद यांचा समावेश होतो. जेव्हा १८ व्या शतकात नव्या विचारांचे प्रवाह निर्माण झाले त्यामधुन आधुनिकतेचा विचार पुढे आला. आधुनिकीकरणाने विवेक आणि विज्ञानाच्या आधारावर प्रगती करु शकते. मनुष्याने विवेकाच्या आधारावर जीवन जगले पाहीजे. अंधश्रध्दा, मागासलेपणा यांचा त्याग केला पाहीजे. मनुष्याचे प्रत्येक वर्तन हे बुध्दी व विवेकाच्याद्वारे समाजातील प्रत्येक गोष्ट तपासली पाहीजे. विवेक हा विज्ञानाची निर्मिती करतो. विज्ञान आणि विवेक यांच्या मदतीने सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न मानवाने केला पाहीजे अशा स्वरुपाचे आधुनिकीकरणाने विज्ञान आणि विवेकाचा पुरस्कार केला.

आधुनिकीकरणाचा मुख्य उद्देश समाजाचे जीवन सुखकारक व आनंददायी करणे हा असून केंद्रियकरण व एकीकरणाच्या प्रक्रियेला पाठींबा देत असतो. त्यांमुळे भांडवलशाही आणि आधुनिकीकरण याची युती होवून आधुनिकतावाद पसरवू लागले व पुढे याला विरोध करणारी त्या नंतरची चळवळ म्हणजे उत्तर-आधुनिकतावाद होय. जेम्स अ‍ॅडव्हॅसन, मायकल फुको इत्यादी विचारवंतानी उत्तर-आधुनिकतावादाचे समर्थन करुन केंद्रियकरणाच्या प्रक्रियेला विरोध केला व विकेंद्रिकरण (De-Centralization) याचा पुरस्कार केला. ज्ञान आणि साध्य यांचा परस्परसंबंध प्रस्थापित करुन ज्ञान हे सत्तेचा आधारभुत स्त्रोत आहे. ज्यावेळी ज्ञान उपयोगी पडत नाही त्यावेळी बळाचा वापर हा मोठ्याप्रमाणात केला पाहीजे अशी मांडणी उत्तर-आधुनिकतावाद्यांनी केली.

उत्तर-आधुनिकतावादी विचार हा आधुनिकता वादाच्या जेव्हा विरोधी निर्माण झाले. तेंव्हा उत्तर-आधुनिकतेचा पुरस्कार झाल्यानंतर पर्यावरण वादी, स्त्रीवाद, शांततावादी विचार पुढे आले. त्याप्रमाणेच पाश्चिमात्य राजकीय विचारांमध्ये उत्तर-आधुनिकतावादाच्या प्रवाहातुन बहुसंस्कृतीवाद व समुदायवादाचे प्रवाह पुढे आलेले आहेत. म्हणून राज्याशास्त्राच्या अभ्यासामध्ये राजकीय सिध्दांताच्या बाबतीत नवीन प्रवाहातील संकल्पना असल्याने बहुसंस्कृतीवादाच्या विषयी प्रस्तुत निबंधविषयांत सैध्दांतिक चर्चा केलेली आहे.

बहुसंस्कृतीवादाच्या मांडणीमध्ये विल किम्लीका, चार्ल्स टेलर, लॉर्ड भिखु पारेख, हॉफमन, सय्यद अली रझा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर इ. च्या विचारांच्या संदर्भात स्पष्ट करण्याचा प्रयत्न प्रस्तुत विषयामध्ये केलेला आहे.

**✻ बहुसंस्कृतीवाद :-**

धर्म संस्कृतीमुळे मानवी समुदायाला एक 'आयडेंटिटी' प्राप्त होते. ते कोण आहेत याची जाणीव होते व त्यांच्यातील विविधतेमुळे समाज जीवनात बहुसंस्कृतीचे विविधता साकारते. त्यातुन नव-नव्या गोष्टी परस्परांत शिकता येतात. सौंदर्यवादी व रचनात्मक दृष्टीकोन स्वीकारुन जीवन अंर्तबाह्य समृध्द बनविता येते. तर त्याच्यातील भिन्नतेमुळे संस्कृती-संघर्षही निर्माण करता येतो. त्यामुळे माणसांच्या वर्तनानुसार धर्म-संस्कृती माणसांमाणसांना जोडते वा तोडते. तसेच स्थलांतरीत मानवी समुहांना जोडण्यासाठी धर्म,संस्कृतीची सांगड घालण्यासाठी बहुसंस्कृतीवादाची (Multiculturalism) संकल्पना कॅनडामध्ये उदयास आली. पश्चिमेकडील देशांमध्ये बहुसांस्कृतीकवाद ही संज्ञा १९७० च्यादशकापासुन अधिक वापरली जाऊ लागली. त्याआधी १९३८ च्या सुमारास सुशोभित संस्कृती 'कल्चरल मोझॅक' असा शब्द जॉन गिबन यांनी आपल्या 'कॅनेडियन मोझॅक' या पुस्तकांमध्ये वापरला होता. १९६५ मध्ये जॉन पोर्टर यांनी 'Vertical मोझॅक' (लंबरेषा संस्कृती) हा शब्दप्रयोग केला होता. बहुसांस्कृतिकवादाचे धोरण म्हणून त्याचा स्विकार सर्वप्रथम कॅनडाने १९७१ मध्ये केलेला आहे. कॅनडामध्ये ब्रिटिश व फ्रेंच नागरिकांनी स्थलांतर केले होते. क्युबिक प्रांतामध्ये फ्रेंच नागरिकांच्या वसाहती होत्या. त्यांच्यासह कॅनडातील इतर स्थानिक गटांची 'आयडेंटिटी' जपण्याच्या उद्दिष्टाने तेथे ("Multiculturalism") (बहुसंस्कृतीवादाला) मान्यता देण्यात आली. कॅनडाचे 'बहुसंस्कृतीवाद' रुजवण्यात तत्कालीन पंतप्रधान 'पिअरे एलिऑट टुडो' यांनी मोठी भूमिका निभावलेली होती. यासंदर्भात 'Poly Ethnic Pluralism' 'पुष्कळ बहुलतावाद' असा शब्द प्रयोग त्यांनी केला होता. पण 'Pluralism' च्या सांस्कृतिक विविधतेचा विचार करता 'Multiculturalisim' ही अधिक व्यापक संकल्पना आहे.

प्राचीन काळी सांस्कृतीक विविधता होती. पण त्यात समानतेचे तत्व अंर्तभूत होतेच असे नाही. त्या काळी सांस्कृतिक विविधता व राजकारण या दोन स्वंतत्र बाबी होत्या. अलिकडच्या काळातील त्या राजकीय आहे. त्यात

समानतेचे तत्व अंर्तभूत आहे. बहुसंस्कृतीवादानुसार कॅनडात असे मानले जाते की, वंश,वर्ण, लिंग, भाषा, धर्म, संस्कृती इत्यादी भेंदाच्या पलिकडे सर्व नागरिक समान आहे. कॅनडातील नागरिकांना आपली आयडेंटिटी जपण्याचा अधिकार आहे. या धोरणामुळे विविध भिन्न गटांतील सामजंस्य आणि सलोखा कायम राहून परस्परातील आणखी विलीन होण्याची शक्यता वाढतात. एक प्रकारे बहुसंस्कृतीवादामुळे राष्ट्रवाद बळकट होवू शकतो, तर दुसरीकडे विविध समाजगटांची आयडेटिंटी जोपासली जाऊन राष्ट्रवाद मागे पडण्याची शक्यता नाकारता येत नाही या पार्श्वभूमीवर बहुसांस्कृतिकवाद म्हणजे नेमके काय आहे यांचे उत्तर शोधायला हवे. कोणत्याही धर्म-संस्कृतीच्या व्यक्तींनी मानवी जीवन व्यवहारांकडे बघण्याचा असा बहुसांस्कृतिक दृष्टीकोन अवलंबिणे म्हणजे बहुसांस्कृतिकवादाकडे वाटचाल करणे होय.

समुदायवाद व बहुसंस्कृतीवाद या विचारांनी युरोप व अमेरिकेमध्ये मोठा प्रभाव निर्माण केला. बहुसंस्कृतीवाद हा इंग्लडमध्ये मोठ्याप्रमाणात विस्तार झालेला आहे. आधुनिक काळामध्ये राष्ट्रां-राष्ट्रांच्यामध्ये कठोर सीमा निर्माण झाल्या. त्यांतुन सीमांच्या बाबतीत अनेक प्रश्न निर्माण झाले. प्रत्येक राष्ट्रांमध्ये काही लोक बहुसंख्याक असतात तर काही लोक अल्पसंख्याक असतात. थोडक्यात (संख्येने जास्त किंवा संख्येने कमी) असतात. बहुसंख्याकांना असे वाटू लागले की, बहुसंख्यांकाचे मत हे अंतिम आहे. बहुसंख्याकांची हुकूमशाही लादण्यात आली व अल्पसंख्याकांचे मत नाकारण्यात आले. बहुसंख्याकांच्या संस्कृतीचा स्विकार करावा, त्यांची भाषा स्विकारावी असा आग्रह धरण्यात आला, त्यामुळे अल्पसंख्याकांच्या मनामध्ये आपल्या अस्मितेविषयी शंका, प्रश्न निर्माण झाले. अनेक राष्ट्रांमध्ये अशी समजूत झाली की, अल्पसंख्यांकाचे राष्ट्र म्हणजे एक प्रकारचा कोंडवाडा वाटतो. राष्ट्राची निर्मिती अपघाताने झालेली असते. राष्ट्र हे एकच भाषा बोलण्याचे, एकाच धर्माचे, संस्कृतीचे असू शकत नाही. ऐतिहासीक काळामध्ये आर्थीक कारणांमुळे लोक स्थलांतर करीत असतात. हे स्थलांतर सर्व राष्ट्रांमध्ये, प्रत्येक देशांमध्ये होत असते. उदा. कित्येक भारतीय लोक अमेरिका, इंग्लड इ. राष्ट्रांमध्ये नोकरी, शिक्षण, वास्तव्य इ.साठी जात असतात. त्यांमुळे या स्थलांतरामध्ये राजकीयतेचा प्रश्न महत्वाचा असतो. त्यांमुळे बहुसंख्यांकांच्या दृष्टीने बहुजनवादी विचार १९९० च्या दशकामध्ये मांडायला सुरुवात केली. या बहुसंस्कृतीवादाची मांडणी करणाऱ्या विचारवंतामध्ये प्रामुख्याने विल किम्लीका (Will Kymlicka), चार्ल्स टेलर (Charles Tayler), लॉर्ड भिखू पारेख (Lord Bhikhu Parekh) इ.विचारवंताचे योगदान महत्वूपर्ण आहे. याशिवाय जॉन हॉफमॅन, व पॉल ग्रॅहम(John Hoffman and Graham Paul), (Sarah Song) सराह सॉंग, सय्यद अली रझा (Syed Ali Raza) इ. विचारवंतानी आपल्या ग्रंथातुन बहुसंस्कृतीवादाची मांडणी आप-आपल्या दृष्टिकोनातुन करण्याचा प्रयत्न केला आहे.

१. **John Hoffman and Paul Graham** यांनी संपादित केलेल्या आपल्या “Introduction of Political Theory”या पुस्तकामध्ये बहुसंस्कृतीवादाची मांडणी केलेली आहे. त्यांच्यामते, बहुसंस्कृतीवाद हे वैयक्तिकतेपेक्षा वेगळ्याप्रकारचा दृष्टीकोण आहे. (Cosmopolitan) ‘विश्वबंधुत्वाचा किंवा विश्वाचा नागरीक’ आणि (Multiculturalism) ‘बहुसंस्कृतीवाद’ हे दोन शब्द सांगितले व ते दोन्ही समान शब्द आहेत. अशाप्रकारची मांडणी केलेली आहे. लोकांच्या विविध वस्तींचा राहणीमाणांचा समावेश होतो. असा हा (Positive) सकारात्मक दृष्टीकोण आहे. तेथील विविध लोकांच्या वस्तीतुन, त्यांच्या संस्कृतीचा आदर करुन त्यांचे राहणीमान, ते कसे जीवन जगतात व जीवनाची जडण-घडण कशी बनली आहे. यांवरुन तेथील संस्कृतीचे दृष्टीकोण समोर येत असतात. संस्कृती, वंश, मानवंशशास्त्र आणि धर्म यांचा परस्पर संबंध जोडण्याचा प्रयत्न यांमध्ये होत असतो.

**२. विल किम्लीका (Will Kymlicka) यांनी सांगितलेले बहुसंस्कृतीवाद :-**

विल किम्लीका या विचारवंताने आपल्या “Liberalism, Community and Culture (1989)” व “Multicultural-Citizenship : A liberal Theory of Minority Rights” (1995) या पुस्तकातुन बहुसंस्कृतीवादी मांडणी केलेली आहे.

विल किम्लीका यांनी आपल्या “Liberalism, Community and Culture (1989)” या पुस्तकामध्ये समानतेविषयी स्वातंत्र्य, आणि त्याकरिता सांस्कृतिची ओळख व्यक्तीच्या वैयक्तिक स्वायत्ततेसाठी कशाप्रकारे महत्वाची आहे हे सांगितलेले आहे. सांस्कृतिक ओळखीसाठी गटांना विशेष अधिकार असावेत अशाप्रकारे सांस्कृतिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करण्याचा प्रयत्न करुन बहुसंस्कृतीवादाची मांडणी केली आहे.

त्याचबरोबर विल किम्लीका यांनी आपल्या दुसऱ्या “Multicultural CitizenShip: A Liberal Theory of Minority Rights” (1995) या महत्वाच्या ग्रंथात विस्तृतपणे बहुसंस्कृतीवादाची मांडणी केलेली आहे. त्याच्या या पुस्तकामध्ये एकुण दहा प्रकरणांचा समावेश असून यांमध्ये प्रस्तावना, बहुसंस्कृतीवादाचे राजकारण (The Politics of

Multiculturalism), वैयक्तिक अधिकार आणि मिळालेले अधिकार (Individual Rights and Collective Right's), उदारमतवादी परंपरेतील विचार (Rethinking the liberal Tradition), अल्पसंख्यांकांचे अधिकार आणि न्याय (Justice and minority Right's), अल्पसंख्याकाकरिता अभिव्यक्तीची खात्री (Ensuring A voice for Minorities), परमधर्म सहिष्णुता आणि त्याच्या मर्यादा, (Toleration and its Limits), वचनबध्द आणि त्याची बांधणी (The Ties that bind), समालोचन (Conclusion) अशा एकूण दहा Topic चा समावेश होतो. विल किम्लीका यांच्या मते, प्रत्येक व्यक्तीला त्या-त्या प्रदेशात राहत असताना, वेगवेगळ्या भूप्रदेशावर वास्तव्य करताना त्यांना तेथे सांस्कृतिक स्वतंत्र असणे आवश्यक आहे. त्यांच्या मनात कोणतीही भिती, असुरक्षीततेची भावना व प्रश्न निर्माण न होता. त्यांना स्वातंत्र्य राहण्याची संधी मिळाली पाहीजे. तेंव्हा आपल्याला धर्माचे पालन करताना कोणत्याही प्रक्रारची आधुनिकतेची भिती नव्हती. अशा स्वरुपाची मांडणी विल किम्लीका यांनी केलेली आहे. तसेच मिळवले अधिकार हे बहुसंस्कृतीवादातील संघर्षाच्या उपायावरुन ठरत असतात. केवळ एकटेपणाचे असून उपयोगाचे नाही तर ते सर्व गटाला लागू होणारे असले पाहीजे. त्याठिकाणी राहणारे लोक आणि (National Minorities) राष्ट्रीय अल्पसंख्याक असे संबोधलेले आहे. की जे विविध ठिकाणाहुन भूप्रदेशातून स्वखुशीने वास्तव्य करण्यासाठी येत असतात. त्यामुळे विविधता असल्याने अनेक देशांमध्ये संस्कृती विभागलेली आहे. त्याचबरोबर सध्यकाळातील अंदाज घेता विल किम्लीका यांनी असे सांगितले की, जगातील १८४ स्वातंत्र्य राष्ट्रांमध्ये ६०० भाषा बोलणारे वेगवेगळे गट राहत आहेत. आणि पाच हजार वंशिक गट आहेत. अतिशय कांही मोजक्या देशांमध्ये भाषेची स्थितीही अशा स्वरुपाचीच आहे. वंशिकदृष्ट्या गट तशाच प्रक्रारचे आहेत. अशाप्रकारे विल किम्लीका यांनी संस्कृती (Culture), वंश (Race), मानववंशशास्त्र (Ethnicity) आणि धर्म (Religion) यांचा परस्पर संबंध स्पष्ट केलेला आहे.

त्याचबरोबर अंतिमत्ता लोकांना सांस्कृतिक अधिकार औपचारीक रित्या मिळाले पाहीजे. सांस्कृतिक स्वातंत्र्य असले पाहीजे याचे आग्रही प्रतिपादन केलेले आहे. 'Differentiated Citizenship' वेगवेगळे नागरिककत्व हे सर्व नागरिकांना मुलभूत राजकीय अधिकाराच्या रुपाने आनंदाने उपभोगता येईल. शेवटी सांस्कृतिक अधिकाराची रेंज (Range) ही सांस्कृतिक गटांच्या स्वरुपाने मर्यादित असली पाहीजे. त्याचबरोबर जागतिक दळणवळणव्यवस्था आणि खुल्या प्रवाहामुळे वंशिक आणि राष्ट्रीय स्वरुपाची ओळख बदललेली आहे. परंतू बहुसंस्कृतीवादाची आव्हाने यांचा अभ्यास करण्यासाठी आपल्या ग्रंथात विल किल्मीका यांनी मांडणी प्रस्तावणे मध्ये केलेली दिसते.

विल किल्मीका यांनी बहुसंस्कृतीवादाचे राजकारण स्पष्ट करीत असताना आधुनिक समाजामध्ये अल्पसंख्याक समाज (गट) हा वर्चस्ववादी असतो असे म्हटले. त्याचबरोबर तो स्व:ताची ओळख निर्माण करत असताना त्यांचे तेथील राहणीमान व संस्कृती भिन्न-भिन्न असते. तेंव्हा 'बहुसंस्कृतीवादाला' आव्हान बनते. अनेक विविध संस्कृतीने मिळुन बहुलवादी (Pluralism) म्हणजे बहुसंस्कृतीवादाचा प्रकार पडतो असे त्यांनी म्हटले आहे. त्याचबरोबर समाजामध्ये एकीकरण करणे महत्वाचे आहे. सर्वसाधारण विविध अल्पसंख्याक गट व त्यांची (Motivation) प्रेरणा हे महत्वाचे असते. विल किम्लीका यांनी त्यासंबंधी "National Minorities" (राष्ट्रीय अल्पसंख्याक) असा शब्दप्रयोग वापरलेला दिसतो. तेथील मूल्य, संस्कृती, वेगवेगळे प्रक्रार किंवा स्वंतत्र शासन हे स्थानिक समाजामध्ये बनते. हा पहिला प्रश्न (Case) विचारला.

दुसरा (Case) प्रश्न हा संस्कृतीची होणारी भिन्नता (diversity) आणि वैयक्तिक स्वरुपाचे कुटूंबाचे होणारे स्थलांतर हे सैल अशी संस्था बनते. तेंव्हा त्याला किम्लीका यांनी "वंशिक गट" (Ethnic Group) म्हटले आहे. तो एक विस्तृत मोठा समाज असतो आणि वंशिक स्वरुपाच्या स्थानिक शासनामध्ये स्वतंत्रपणे प्रभाव पाडत असतात. वेगवेगळ्या संस्कृतीमधुन लोक सार्वजनिक स्वरुपाच्या मुख्य कार्यात भाग घेतात व संस्था स्थापन करीत असतात. एकंदरीत बहुसंस्कृतीवादाच्या राजकारणांची चर्चा येते केलली दिसते.

विल किम्लीका यांनी 'बहुराष्ट्रीय राज्ये' (Multinational States) आणि 'पुष्कळ वंशीय राज्ये' (Poly ethnic states) अशाप्रकारे विभागणी केलेली आहे. ज्यामध्ये राष्ट्र-राज्य, व बहुराष्ट्रीय राज्य असा संबंध आहे. त्यांमध्ये संस्कृतीचा प्रकार म्हणजे National Minorities असा आपण वर सांगितलेला आहे. कॅनडामधील शासनाच्या बहुसंस्कृतीवादी धोरणांचा अभ्यास चिकित्सकरित्या केलेला दिसतो व तेथील धोरण हे पुष्कळ अशा वंशीक गटांना हिताचे ठरले आहे. फ्रेंच कॅनडीयन विरुध्द भाषा बहुसंस्कृतीवाद आहे. कारण येथील धोरण राष्ट्राच्या काळजीपेक्षा वंशीकतेला जवळ करणारे आहे. हा आक्षेप विल किम्लीका यांनी ठेवला आहे. त्यामुळे बहुसंस्कृतीवादाचे धोरण हे पुष्कळ वंशवादी

गटांना (Polyethnicity) पाठिंबा देणारे आहे. वेगवेगळ्या ठिकाणाहुन आलेले लोक हे विविध संस्कृतीचे, विविध राहणीमान यांचे असतात. तेंव्हा (Pluralism Cultural) बहुलवादी संस्कृती असे म्हटले आहे. उदा :- यु.एस.ए., ऑस्ट्रेलिया, कॅनडा इ. मध्ये आहे. कॅनडा मधील धोरण हे बहुसंस्कृतीवादाचे होते हे आपण पाहीलेले आहोत. बहुसंस्कृतीवादाचे धोरण (Gay Culture) तेजस्वी संस्कृती व (bureaucratize Culture) प्रशासकीय संस्कृतीमध्ये आहे. हा पहिला प्रकार होय. तर दुसऱ्या प्रकारामध्ये रुढी किंवा सुसंस्कृतपणा अशा स्वरुपाच्या (Customs or Civilization) वंशीक गट, लोकांना (Customs) असा उल्लेख केला आहे. तर कॅनडामधील धोरण हे बहुसंस्कृतीवादाचे आहे. त्याला (Civilization) म्हटले आहे. उदा. जर्मन लोक रशियामध्ये राहतात. मात्र ते जर्मनीचे देखील नागरीक आहेत. त्याप्रमाणे ते जर्मन संस्कृतीची जोपासना करत असतात व नागरिक म्हणून देखील जोपासना करत असतात. अशाप्रकारे विल किम्लीका यांनी आपल्या पुस्तकांमधुन बहुसंस्कृतीवादाची मांडणी केलेली आहे. आयरिश यंग या विचारवंताने या स्वरुपाला "Differential Citizenship" 'वेगवेगळे नागरिकत्व' असा शब्द वापरला आहे. याची स्पष्टता विल किम्लीका यांनी आपल्या पुस्तकातून केलेली आहे.

**३. चार्ल्स टेलर च्या मते :-**

चार्ल्स टेलर या विचारवंताने आपल्या "The Politics of Recognition" (१९९३) या पुस्तकातुन बहुसंस्कृतीवादाची मांडणी केलेली आहे. टेलरच्या मते, "बहुसंस्कृतीवाद" म्हणजे मनुष्याची ओळख समुदाय वादाच्या विचारांच्या चौकटीतुन माहिती रुपाने समोर येते. विशेषता त्यांच्या विविध संस्कृतीतुन बंधुतेच्या समानतेचे राजकारण विशद होत असते. यातून समानता समजावून घेताना (Sameness) "सारखेपणा किंवा तोचपणा" हा आपण विविध परिस्थितीत वेगवेगळ्या गरजा असणे, ओळख, प्रतिके आणि ध्येय बाळगणे यातून विविध लोक बंधुतेची समानता जोपासत असतात. त्यांमधुन व्यापक स्वरुपाचा बहुसंस्कृतीवाद स्पष्ट होत असतो. शिवाय टेलरने संस्कृती म्हणजे 'Preserved' जोपासना केलेली 'Strengthed' सामर्थ्यवान, एक मुल्यवादी, स्थितीशील प्रक्रियेला ('Strong Multiculturalism") सामर्थ्यवान बहुसंस्कृतीवाद म्हटले आहे.त्याचबरोबर फ्रेंच भाषेविषयी त्यांने मांडणी केलेले दिसते. जरी टेलरने याविषयी मांडणी केलेली असली तरी (Primary Good) चे पायाभुत मांडणी जॉन रॉल्सने केलेली आहे. असे मत टेलरने मांडले, थोडक्यात विविध समुहातील लोक विविध संस्कृतीची जोपासना करत असताना सांस्कृतिकरित्या समानतेची बधुंता जोपासत असतात. त्यांना तेथे बहुसंस्कृतीवाद असतो असे चार्ल्स टेलरने म्हटले आहे.

**४. भिखु पारेख यांनी सांगितलेला बहुसंस्कृतीवाद :-**

बहुसंस्कृतीवादाची मांडणी उत्कृष्ठ करण्यामध्ये व त्याचे सिध्दांतन करण्यामध्ये विल किम्लीका चार्ल्स टेलर याप्रमाणेच लॉर्ड भिखु पारेख यांचे देखील नांव घेतले जाते. भिखु पारेख या विचारवंताने आपल्या "Rethinking Multiculturalism: Cultural Diversity and Political Theory" (2002) या पुस्तकामध्ये बहुसंस्कृतीवादाची मांडणी केलेली आहे.

**१) त्यांनी चार प्रश्न उपस्थित केले आहेत.**

**पहिला प्रश्न :-** बहुसंस्कृतीवाद आणि सांस्कृतिक विविधता या संदर्भात आहे. अनेक पर्याय बहुसंस्कृतीत उपलब्ध करण्यावर भर देणे हा आहे.

**दुसरा प्रश्न :-** प्रत्येकाला त्याच्या संस्कृती प्रमाणे जगण्याचा अधिकार आहे. आणि समाजाने अशी परिस्थिती निर्माण केली पाहीजे की, ज्यामुळे लोक आपले सांस्कृतीक स्वातंत्र्य कोणतेही भिती न बाळगता जगू शकतील.

**तिसरा प्रश्न :-** हा सांस्कृतीक, बहुविविधता सुंदर आणि पर्यायी बनते या संदर्भात प्रश्न उपस्थित केला.

**चौथा प्रश्न :-** हा बहुसंस्कृतीवर समाजातील वेगवेगळ्या संस्कृतीमध्ये सकारात्मक स्पर्धा निर्माण होतात. त्यामुळे बहुसंस्कृतीवादाला विरोध करु नये असे म्हटले आहे. भिखु, पारेख यांच्या मते लोकप्रिय लोकांना अशाप्रकारे बहुसंस्कृतीवाद हा पारंपारीक समाजाच्या, संस्कृतीच्या सरभेसळेतून, बहुविविधतेतुन निश्चित आणि मुलभूत स्वरुपाची तेथील वेगवेगळी संस्कृती स्पष्ट होते हा प्रश्न विचारला.

**२) एकाच समाजात राहताना लोकांच्यामध्ये संस्कृतीची सांस्कृतीक देवाण-घेवाण झाली पाहीजे :-**

भिखू पारेख यांच्यामते, एकाच समाजात राहताना लोकांच्यामते संस्कृतीची सांस्कृतीक देवाण-घेवाण झाली पाहीजे त्यामुळे इतरांकडे ज्या कांही चांगल्या गोष्टी आहेत त्या टाकून देतो. म्हणून वेगवेगळ्या संस्कृतीमध्ये लोक एकमेकांजवळ मिळून राहीले पाहीजेत. या सांस्कृतिक विविधतेमुळे लोकांना स्वातंत्र्य मिळते व पर्याय देखील मिळतात. त्यांमुळे या

सांस्कृतिक स्वातंत्र्यामुळे आपण सहज आपल्या अंतरंगामध्ये डोकावून पाहतो. आपल्या व्यक्तीमत्वाला न्याय देण्याचा प्रयत्न करीत असतो.

**३) 'एकसंग संस्कृती' कोणतीच असू शकत नाही :-**

भिखू पारेख यांच्या मते, 'एकसंग संस्कृती' कोणतीच असू शकत नाही त्यामुळे प्रत्येक संस्कृती ही वेगवेगळ्या प्रवाहाने निर्माण झाली आहे. उदा :- हिंदू संस्कृती ही बौध्द, जैन, इस्लाम, आदिवासी इ. लोकांच्या प्रभावाखाली निर्माण झालेली आहे. ही एकसंग संस्कृती आदर्श असते. प्रत्येक संस्कृती ही तीच्या जडण-घडणीमध्ये वेगवेगळ्या प्रकारे प्रभावीत झालेली असते. जी वेगवेगळी संस्कृती आहे. तीचा अर्थ वेगवेगळ्या प्रकारे लावला जातो. सांस्कृतिक परंपरेमध्ये नेहमी वेगवेगळे अर्थ लावले जातात. सांस्कृतिक विविधता अशाप्रकारे अर्थ लावण्यास परवानगी देते. हे अर्थ लक्षात घेऊन आपल्या संस्कृतीचे उदा :- भारतीय पशू संस्कृती व कृषी संस्कृतीमध्ये बळी राजाचे महत्व दिसून येते. लोकांना बहुसंस्कृती सांगुन आपण त्यांची स्वत:ची संस्कृती असून वेगवेगळे अर्थ लावले जाते. असे भिखू पारेख यांनी सांगितले.

**४) संस्कृतीला एकवाक्यता करु शकत नाही. :-**

भिखू पारेख यांच्या मते, आपण कोणत्याही प्रकारे संस्कृतीला एकवाक्यता करु शकत नाही. संस्कृतीमध्ये वेगवेगळे घटक असतात. त्यांचा वेगवेगळ्या प्रकारे विकास होणे महत्वाचे असते. आपल्या समाजामध्ये, संस्कृतीमध्ये मतभेद असु शकतात. उदा. अंतर्गत मतभेद व बाह्य मतभेद समाजामध्ये असतात. हे मतभेद निर्माण होणे म्हणजे समाज कमजोर होणे नव्हे. तर समाजाला त्यांच्यावर सहिष्णू वृत्तीने वागले पाहीजे. या मतभेदाने नुकसान काहिच होत नाही तर एकमेकांना समृध्द केले जाते व त्याची ताकद वाढवली जाते.

अंतर्गत मतभेद समाजाला समृध्द करण्याची भूमिका बजावते. उदा. भारतामध्ये इंग्रज आले तेंव्हा ख्रिश्चन मिशनऱ्यांनी कठोर अशी टिका हिंदू धर्मावर, समाजावर केली. त्या टिकेमुळे हिंदू समाजाला आत्मपरिक्षण करण्याची परिस्थिती निर्माण झाली. या धर्म चिकित्सेमुळे हिंदू धर्मातील जुन्या गोष्टी, अनिष्ठ परंपरा ह्या सुधारणा करुन नष्ठ करण्यासाठी त्याचा फायदा झाला. म्हणून मतभेद हे जीवनामध्ये आवश्यक व लायक अशा स्वरुपाचे आहेत. त्यामुळे बहुसंस्कृतीवाद धार्मिक व पारंपारीक विचारांचा पुरस्कर्ता आहे. असे भिखू पारेख या विचारवंताने म्हटले आहे.

**५) वेगवेगळ्या संस्कृतीमध्ये सुसंबंध साधला पाहीजे :-**

भिखू पारेख यांच्या मते "Inter Cultural dialogues is necessary" म्हणजे वेगवेगळ्या विविध संस्कृतीमध्ये विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी सुसंबंध साधला पाहीजे. हिंदू -मुस्लीम यांनी परस्पर चर्चा केली पाहीजे. हिंदू धर्मामध्ये हिदूं राष्ट्रवादी हे मुस्लीमांचा व्देष करतात. ते व्देषांवर आधारित असल्याने समाजाचे नुकसान होत असते. त्यांमुळे त्यांच्यामध्ये सुसंवाद, चर्चा ह्या विविध वेगवेगळ्या सामाजीक संस्कृतीमध्ये झाल्या पाहीजे. या चर्चेमधुन त्यासमाजाला मोठ्या प्रमाणात बहुसंस्कृतीवाद, सांस्कृतीक विविधतेला मान्यता देवून मानवतावादी मुल्यांचे संगोपन करतो. धर्मनिरपेक्षतेच्या नावाने त्यांच्यावर बंदी घातली तर लोकांचे अधिकार मर्यादीत होतात व त्यांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागते.

अशा प्रकारे मांडणी भिखू पारेख या विचारवंताने बहुसंस्कृतीवादाच्या संदर्भात केलेली आहे.

**५. सय्यद अली रझा यांनी सांगितलेला बहुसंस्कृतीवाद :-**

सय्यद अली रझा "Syed Ali Raza" विचारवंताने खऱ्या अर्थाने बहुसंस्कृतीवादाची विस्तृत मांडणी केलेली आहे. या लेखकाने आपल्या "About Religious Interfaith and Harmony- Multiculturalism" या पुस्तकामध्ये बहुसंस्कृतीवादाची चर्चा करताना बहुसंस्कृतीवाद, धर्माचा हस्तक्षेप आणि सलोखा, बहुसांस्कृतीक जगामधील इस्लाम, (Multiculturalism and Monotheism) बहुसांस्कृतीक आणि एकेश्वरवाद मधील तुलना हे या पुस्तकातील पहिल्या भागामध्ये केलेली आहे. तर पुस्तकांच्या दुसऱ्या भागामध्ये संस्कृती आणि (Its origin) त्यांची उत्पत्ति, पाकिस्तानी संस्कृती, पाश्चात्य संस्कृती यांची चर्चा केलेली आहे.

सय्यद अली रझा या लेखकांच्या मते, 'संस्कृती' (Culture) हा (Cultivation) वेगवेगळ्या संस्कृतीला आंतरसंबंध स्पष्ट करणारा शब्द आहे. 'संस्कृती' हा शब्द तीन आधारासाठी उपयोगी पडतो.

**१) तीन आधार सांगितले**

१) पहिला :- जगातील विविध विद्वत्तेची चाचणी करण्याकरिता.

२) दुसरा :- मानवी ज्ञानाच्या एकीकरणासाठी आपले जीवन जगत असताना त्यांचे वर्तन सामाजीक स्वरुपातील प्रतिके, क्षमता यातुन तपासण्यासाठी.

३) तिसरा :- त्यातील दृष्टीकोण, मुल्ये, ध्येय, आणि प्रत्यक्ष व्यवहार हे संघटनात्मक, संस्थात्मक, गटांच्यापातळीवर त्यांची वैशिष्ट्ये संस्कृतीवर आधारभूत आहे. तेंव्हा ही संस्कृती सांस्कृतीकवादाचा विचार, १८ व्या व १९ व्या शतकात पुढे आला असे लेखकाने म्हंटले आहे. सय्यद अली रझा यांनी आपल्या पुस्तकात असे म्हटले की, सर्व राज्यशास्त्रज्ञाच्या मते, संस्कृतीच्या संदर्भात इतिहासामध्ये अंतर्गत सुंसंस्कृतपणा आणणारा प्रकार आहे असे म्हटले आहे.

**२) बहुसंस्कृतीवाद स्वेच्छेने बनलेले मिश्रण आहे :-**

सय्यद अली रझा यांच्या मते, बहुसंस्कृतीवादमध्ये विविध संस्कृतीचे लोक स्वेच्छेने एकत्रीत येऊन राहत असतात. त्यांनी बनलेले मिश्रण आहे (Salad Bowl) असे म्हटले आहे. या संदर्भात अनेक विश्लेषकांची सिध्दांतामध्ये भिन्नता या विषयाच्या बाबतीत आहे. बहुसंस्कृतीवाद ही विविध समाजातील एक-दुसऱ्या गोष्टीमध्ये समाविष्ट होणारी संस्कृती आणि नागरिकीकरण याकरिता आदर्शव्यवस्था आहे. मानवतावाद हा विविध युगातून म्हणजे दगडी युग, औद्योगिक युग आणि तंत्रज्ञान युग या काळातुन विकसित व वाढत आलेला आहे. परंतु येथे एकटी, एकटा राहणारा संस्कृती नव्हती. तर आदर्शवादी समाजाच्या उन्नतीसाठी बहुसंस्कती आहे.

**३) बहुसांस्कृतीक समाज :-**

बहुसंस्कृतीवाद म्हणजे त्यांचे दुसरे नांव हे (Civilization) म्हणजे 'सामाजीक सांस्कृतिक विकास पावलेले' या अर्थाने वेगवेगळ्या विविध समाजातुन एकत्रीत स्थापन झालेला समाज म्हणजे 'बहुसंस्कृतीवाद' होय. जगातील विविध भागातील लोक हे रंग, रुप, संस्कृती, धर्म, राहणीमान इ. बाबतीत भिन्न भिन्न स्वरुपाचे असतात. ते नोकरी, व्यवसाय किंवा शिक्षण इ. करिता एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी येत असतात. वास्तव्य करुन आपले जीवन जगत असतात. तेंव्हा तेथे विविध भिन्न संस्कृतीचे लोक एकत्रीत राहत असतात. त्याला "बहुसांस्कृतिक समाज" (Multicultural Society) असे सय्यद अली रझा यांनी म्हटले आहे. त्यांनी पॅरिस, बर्लीन, न्युयॉर्क, लंडन इ. मोठ्या शहरांचे देखिल त्या संदर्भात उल्लेख केलेला दिसून येतो.

**४) बहुसांस्कृतीक समाजामध्ये विश्व नागरिकत्व असते असा उल्लेख केला :-**

सय्यद अली रझा यांनी बहुसांस्कृतीक समाजामध्ये राहणाऱ्या अशा प्रकारच्या लोकांना (Cosmopolitians) "विश्वाचा नागरिक किंवा विश्वबंधुत्व जोपासणारा नागरिक" असा उल्लेख केला आहे. की जेथे विविध रंग, रुप, संस्कृती इ. भिन्न स्वरुपाचे लोक राहत असतात. तसेच न्युयॉर्क, चीन, रशिया इ.देशांमध्ये लोक रंग, वेशभुषा, राहणीमानाचा दर्जा इत्यादी बाबतीत भिन्न स्वरुपाचे आहेत व त्यांच्या संस्कृती देखिल भिन्न स्वरुपाच्या आहेत. त्यांमुळे असा बहुसंस्कृतीने राहणारा "बहुसांस्कृतिक समाज" हा जास्त सुधारलेला असतो व तो विश्वबंधुत्व व विश्वाचा नागरिक असणारा असतो असे म्हटले आहे.

**५) संस्कृतीच्या विविधतेतुन त्यांच्यामध्ये विवाह झाल्यावर खऱ्या अर्थाने बहुसंस्कृतीवाद समाज दिसुन येतो. :-**

सय्यद अली रझा यांनी बहुसंस्कृतीवादाची ठळक मांडणी करत असताना असे म्हंटले की, वेगवेगळ्या संस्कृतीतील अनुभव समजावुन घेण्याचा पहिला भाग म्हणजे खऱ्या अर्थाने बहुसांस्कृतिक समाजातील लोक हे आपल्या वेगवेगळ्या संस्कृतीची,भाषा, लिपी, राहणीमानाच्या दर्जा इ. पार्श्वभूमी असताना, त्यांचे धर्मामध्ये देखिल विविधता असले तरी ते एकत्रीत राहतात व त्याच बरोबर ते विविध संस्कृतीमध्ये ज्यावेळेस विवाह होतात. तेंव्हा तेथील समाज हा बहुसांस्कृतीक असतो. उदा. विविध जाती, धर्म, भाषा, वर्ण इत्यांदीमध्ये भेदभाव न करता आंतरजातीय विवाह झाले पाहीजे याचा पुरस्कार करणारे असेच आहे.

**६) बहुसंस्कृतीवादामधील धर्माची भुमिका :-**

सय्यद अली रझा यांनी आपल्या पुस्तकांमध्ये बहुसंस्कृतीवादामधील धर्माची भूमिका देखिल स्पष्ट केली आहे. त्यांच्या मते, सैध्दांतिक दृष्ट्या धर्मामध्ये वेगवेगळ्या विविध संस्कृती आल्या. मनुष्य जीवन जगत असताना संस्कृतीचा आधार हा धर्म असतो. प्राचीन प्रवासी हे बदललेल्या वातावरणाचा अभ्यास करत होते. धर्मावर आधारित इस्लाम हा अरबांचा भाग आहे. त्यांमध्ये त्यांचे जीवन जगणे, राहणीमान, वेशभूषा, हिंदुच्या दृष्ट्या व ब्रिटिशांच्या दृष्ट्या भिन्न स्वरुपाची होती. ब्रिटनमध्ये राहणारी हिंदू समुदाय हा मांस खातात, परंतु त्यांच्या धर्मातील हिंदुत्ववाद विश्वबंधुता निर्माण करत असताना मांस खाण्याची परवानगी देत नाही. थोडक्यात भिन्नता दिसुन येते. हे सय्यद अली रझा यांनी स्पष्ट केले आहे. बहुसंस्कृतीवाद हा एक संस्कृतीवादातून (Mono-Culturalism) स्पष्ट केलेला आहे. आफ्रिका,आशिया आणि अमेरिकेतील सांस्कृतिक भिन्नता बहुसंस्कृतीवादाच्या संदर्भात वर्णन करताना त्यामध्ये समुदायवाद हा मुख्य प्रवाह आहे असे मत मांडले आहे. बहुसंस्कृतीवादाचे उदाहरण कॅनडामधील देताना सांगितले की, बहुसंस्कृतीवादाचा कायदा कॅनडामध्ये बणविण्यात आले. (Section) २७ या मधुन कॅनडीयन लोकांच्या सांस्कृतिक स्वातंत्र्याचे अधिकार २००१ मध्ये दिलेले

आहेत. सुमारे २,५०,६४० लोकांची स्थलांतरीत होऊन विविध भागातून वास्तव्यासाठी कॅनडामध्ये आलेले आहेत. तर अमेरिकेमध्ये म्हणावी तितकी बहुसांस्कृतिकवादाची स्थापना संघराज्य पातळीमध्ये झालेली नाही. त्याचबरोबर यु.के.मध्ये १९७० आणि १९८० मध्ये स्थानिक प्रशासनाच्या दृष्टीने बहुसांस्कृतीक धोरण टॉनी ब्लेअर यांनी जाहीर केले. आर्यलंडमध्ये भारतीय लोक विशेष करुन राहत आहेत. तेथे ब्रिटीश नागरिकांचे (Record) १४०,७९५ (१२%) सन २००० मध्ये तेथे बहुसंख्येने आफ्रिकेतील (३२%) आणि आशियातील (४०%) लोक व त्यांचे गट समुदाय जीवन जगत आहेत. तेथे पाकिस्तान, भारत, सोमालिया येथील लोक आहेत. मात्र इंग्लंडमधील तत्कालीन प्रधानमंत्री पुराणमतवादी पक्षाचा नेता डेविड कॅमरन यांच्यामते "State Multiculturalism has failed" राज्य बहुसंस्कृतीवाद अपयशी ठरला आहे. असे म्हटले आहे. असे सय्यद अली रझा यांनी आपल्या पुस्तकांमधुन सांगितले आहे.

त्याच बरोबर युरोप खंडातील संस्कृतीवादाची चर्चा केली आहे. पाकिस्तान आणि भारत यांची चर्चा केलेली दिसून येते. सय्यद अली रझा यांच्या मते, पाकिस्तान व भारत या देशामध्ये वंश,धर्म, जात, संस्कृती, भाषा, ठिकाण इ. दृष्टीने विविध मोठ्या प्रमाणात भिन्नता आहे. भारतीय संस्कृतीमध्ये विविधता व भिन्नता आहे. त्यास बहुसंस्कृतीवाद म्हटले आहे. येथे हिंदू, बौध्द, जैन, मुस्लीम, ख्रिश्चन, पारशी, शीख इत्यादी धर्माचे लोक राहत आहेत. येथे विविध भाषा बोलल्या जातात. अशाप्रकारे स्पष्टता सय्यद अली रझा यांनी केले आहे.

एकंदरीत सय्यद अली रझा यांनी वरीलप्रमाणे आपल्या पुस्तकांमधुन बहुसंस्कृती वादाची मांडणी केलेली आहे.

**६. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भुमिका :-**

भारतातील बहुसांस्कृतीकवादाची मांडणी करताना येथे भारतीय राज्यघटनेच्या संदर्भात करता येईल. भारतीय राज्यघटना निर्मिती प्रक्रियेमध्ये संविधान सभेच्या अहवालामध्ये भाग-३ मधील ४ नोंव्हेबर १९४८ ते ९ नोव्हेंबर १९४८ मध्ये संविधान सभा बोलावण्यात आलेली होती. त्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे विव्दतापूर्ण भाषण ४ नोंव्हेंबर १९४८ रोजी भारतीय संविधानांचे आधारभुत सिध्दांताचे विवेचन करणारे असे झाले. त्यावेळी त्यांनी अल्पसंख्याक व बहुसंख्याक यासंदर्भात मांडणी केलेली दिसून येते. घटनेच्या मसुदा समितीने अल्पसंख्याकाकरिता जे कांही संरक्षणाकरिता तरतुदी केलेल्या आहेत. त्या तरतुदी योग्य आहेत असे त्यांनी म्हटले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, "या देशात अल्पसंख्याक आणि बहुसंख्याक यादोघांनीही चुकिचा मार्ग अनुसरला आहे. अल्पसंख्याकांचे अस्तित्व नाकारणे ही बहुसंख्याकांची चुक आहे." यांवर उपाय शोधणे आवश्यक आहे. यातुन पुढे अल्पसंख्याक व बहुसंख्याक हे एकमेकांत विलीन होतील अशी आशा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त केलेली आहे.

जे दुराग्रही आहेत, कट्टर विरोधी आहेत, ज्यांनी अल्पसंख्याकांना दिल्या जाणाऱ्या संरक्षणा प्रती एक प्रकारची धर्मांधता विकसित केलेली आहे. त्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दोन गोष्टी सांगितलेल्या आहेत. "एक म्हणजे अल्पसंख्याक ही विस्फोटक शक्ती आहे. जर यांचा विस्फोट झाला तर त्यांमुळे यादेशाची संपूर्ण इमारतच उध्वस्त होईल. युरोपचा इतिहास या भयानक वास्तव्याचे पुरावे प्रस्तुत करतो." तर दुसरी गोष्ट अशी की, "भारतातील अल्पसंख्याकांनी त्यांचे अस्तित्व आणि भवितव्य बहुसंख्यांकांच्या स्वाधीन करणे मान्य केले आहे." असे सांगितले. तेंव्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आर्यलंडचे उदाहरण दिले आहे. ते म्हणतात की, "आर्यलंडचे विभाजन टाळण्यासाठी ज्या वाटाघाटी झाल्या." त्यांच्या इतिहासात रेडमंड कार्सनला म्हणतो की, "अल्पसंख्याक प्रॉटेस्टंटाच्या सुरक्षेकरिता कोणत्याही प्रावधानांची मागणी करा, पण आपण आपल्याला लाभलेले एकसंघ आर्यलंड एकसंघ राहु द्याव यावरुन कार्सन उत्तरा दाखल म्हणतो की, तुमच्या संरक्षणाचा धिक्कार असो. तुम्ही आमच्यावर राज्य करावे हे आंम्हाला मान्य नाही." हे उदाहरण देऊन बाबासाहेब पुढे म्हणतात की, "आर्यलंड सारखी भारतातील कोणतीही भूमिका अल्पसंख्याक समुदायाने घेतलेली नाही. त्यांनी इमाने इतबारे बहुसंख्याकांचे राज्य स्विकारले आहे. बहुसंख्याक हे मुळात राजकीय बहुसंख्याक नाहीत. ते जातीयदृष्ट्या बहुसंख्याक आहेत. म्हणुन बहुसंख्याकांनी अल्पसंख्याकाप्रती पक्षपात न करणे हे आपले कर्तव्य आहे यांची जाणीव ठेवावी. अल्पसंख्याकांचे अस्तित्व टिकुन राहणे अथवा नाहीसे होणे हे सर्वस्वी बहुसंख्यांकांच्या वृत्तीवर अवलंबुन आहे. ज्याक्षणी अल्पसंख्याकाप्रती कांही आधारच राहणार नाही. त्यांचे अस्तित्व लुप्त होईल." अशाप्रकारे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बहुसंख्यांक व अल्पसंख्यांक यांची मांडणी करुन आपल्या भाषणातुन सांगितलेली सैंध्दांतिक स्वरुपाची अशी चर्चा बहुसंस्कृतीवाद सांगणारी अशीच आहे. त्याचबरोबर वरीलप्रकारच्या पाश्चात्य विचारवंतापेक्षा वेगळी व अधिक स्पष्टपणे सुरुवातीला मुलभूत अशी मांडणी भारतात केलेली होती. याची जाणीव आपल्याला होऊ लागते. जात, धर्म, वंश, पंथ, वेशभूषा,राहणीमान इत्यादीबाबत भारतात खुप मोठ्या प्रमाणात विविधता आहे. या विविधतेतून एकता निर्माण

करण्यासाठी व राष्ट्रीय एकता आणि अखंडता निर्माण करुन राष्ट्रीय एकात्मता जोपासण्याच्या दृष्टीने अल्पसंख्याक व बहुसंख्यांक यांना केलेली सुचना होती इ. आपल्या लक्षात घ्यावे लागते. त्यांमुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे हे विचार बहुसंस्कृतीवादाच्या संदर्भात सिध्दांत मांडणारे होते. याची नोंद राज्यशास्त्रांच्या अभ्यासकांनी घ्यावी लागेल. त्यामुळे भारतीय राज्यघटनेतील कलम ५ ते ११ मधील नागरीकत्वाविषयची तरतुद यातुन भारतीय नागरीकांना मिळालेले एकेरी नागरीकत्व आणि भारतीय राज्यघटनेच्या मुलभूत अधिकारामध्ये कलम २९ ते ३० मध्ये शैक्षणिक व सांस्कृतिक अधिकार नागरिकांना दिलेले आहेत. कि यामध्ये भाषा, लिपी, जपण्याचा अधिकार, अल्पसंख्याकांना दिलेला आहे. त्याचबरोबर कलम २५ ते २८ मध्ये धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार देऊन प्रत्येक व्यक्तींना आपल्या धर्माचे प्रचार, प्रसार व मुक्त प्रतिपादन करण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे. पण ते स्वातंत्र्य उपभोगत असताना इतरांच्या धर्मस्वातंत्र्यावर गदा येणार नाही याची काळजी घ्यावी. हे धार्मिक स्वातंत्र्यातून स्पष्ट केलेले आहे. हा धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार येथील नागरिकांना आहे. येथील शासन व्यवस्थेला कोणताही धर्म असणार नाही. परिणामी येथील शासनव्यवस्थेचा धर्माला राजाश्रय नाही. यातुन धर्मनिरपेक्षता स्पष्ट होते.

विविध जाती, धर्म, पंत, वेशभूषा, राहणीमान इ. मधील विविधता व यामधुन राष्ट्रीय एकता आणि एकात्मता राखाणारी बंधुता निर्माण करण्यासाठी याअधिकारांची तरतुद केली आहे.

खऱ्या अर्थाने भारतातील बहुसंस्कृतीवादाचा सिध्दांत हा भारतीय राज्यघटनेमधील या तरतुदीतुन स्पष्ट होतो की, यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेले बहुसंख्याक व अल्पसंख्याक या संदर्भातील विचार हे राष्ट्राच्या एकीकरणाच्या दृष्टीने पार पाडण्याची जबाबदारी व कर्तव्ये ही भारतीय संघराज्य व राष्ट्राच्या अखंडतेसाठी महत्वाची आहेत.

अशाप्रकारे बहुसंस्कृतीवादाचा सिध्दांत राजकीय सिध्दांतामध्ये नव्याने अस्तित्वात आलेला आहे.

**समारोप :-** राज्यशास्त्राच्या अभ्यासामध्ये आधुनिक राजकीय संकल्पना, नवीन संकल्पना सिध्दांत रुपाने अस्तित्वात आले आहेत. राज्याशास्त्राच्या अभ्यासामध्ये राजकीय सिध्दांताच्या बाबतीत पर्यावरणवाद, समुदावाद, उत्तर-आधुनिकतावाद, बहुसंस्कृतीवाद हे नवे सिंध्दात महत्वाचे आहेत. थोडक्यात अल्पसंख्यांकाच्या मनामध्ये बहुसंख्याकांची भिती न बाळगता व बहुसंख्याकांनी आपले मत अंतिम समजुन ते अल्पसंख्याकांवर न लादता सांस्कृतिक स्वातंत्र्याचा अधिकार देणे व एकत्रीत समाजात राहताना सांस्कृतिक विचारांची देवाण-घेवाण होणे व त्यांमध्ये वेगवेगळ्या संस्कृतीमध्ये सुसंबंध साधणे हे बहुसंस्कृतीवादामध्ये महत्वाचे आहे. त्याचबरोबर सांस्कृतीक स्वांतत्र्याचा पुरस्कार करणारा असा हा बहुसंस्कृतीवाद आहे त्याचबरोबर भारतामध्ये बहुसंख्याक हा राजकीय दृष्ट्या नसुन तो जातीय दृष्ट्या आहे. अल्पसंख्याक हे राजकीय दृष्टया कमी आहेत. यांच्यामध्ये परस्परसंबंध स्पष्ट निर्माण होवून पुढे एकीकरण होणे हे भारतीय राष्ट्रीय अखंडतेसाठी व एकात्मतेसाठी महत्वाचे आहे. असे सांगितलेले बहुसंस्कृतीवाद हा डॉ.आंबेडकरांच्या ४ नोंव्हेंबर १९४८ च्या भाषणामधुन अल्पसंख्याक व बहुसंख्याक याबद्दलच्या विचारातुन स्पष्ट होतो. पाश्चात्य विचारवंतापेक्षाही यापूर्वी भारतामध्ये डॉ.आंबेडकरांनी याची स्पष्ट मांडणी केली होती हे समोर येते. अशाप्रकारे बहुसंस्कृतीवादाचा सिध्दांत हा विविध विचारवंतानी आपल्यापरिने स्पष्ट केलेला आहे. यामधुन सांस्कृतीक अधिकाराचा पुरस्कार केलेला आहे. थोडक्यात बहुसांस्कृतीवादामुळे विविध संस्कृतीमध्ये सलोखा, सामंजस्य निर्माण होऊन राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने व बंधुतेच्या दृष्टीने महत्वाचे आहे.परंतु राष्ट्रवादाला आव्हान बनु शकते हे नाकारता येत नाही. प्रत्येक समुदाय किंवा सांस्कृतीक गट हा आपापल्या संस्कृतीचे जतन व जोपासना करत असताना दिसतो. त्यामुळे पुढे विश्व नागरीकत्व किंवा विश्वबंधुत्व या सारख्या गोष्टी मानवी विकासासाठी महत्वाच्या ठरु शकतील. सांस्कृतीक स्वातंत्र्य, अधिकार यांची हमी मिळत असते. त्यामुळे बहुसंख्याक व अल्पसंख्याकांनी आपआपल्या संस्कृतीची जोपासना करीत असले तरी ते इतरांच्या संस्कृतीचा आदर करुन समाजात सलोखा निर्माण करणे महत्वाचे असते. विविध संस्कृती, धर्म, भाषा, जात इत्यादी भिन्न लोक एकत्रीत रहात असताना त्यांच्यामते ज्यावेळेस खऱ्या अर्थाने विवाह होतील. तेंव्हा त्यामध्ये बहुसंस्कृतीवाद स्पष्ट होतो. पुढे बहुसंख्याक व अल्पसंख्याक हे एकमेकात बंधुतेच्या भावनेने विलिन होतील. तेंव्हा विश्वबंधुता व विश्वनागरीकत्वाच्या दृष्टीने आणि सांस्कृतीक स्वातंत्र्याच्या अधिकाराच्या दृष्टीने हे महत्वाचे आहे. अशा प्रकारे एकंदरीत बहुसंस्कृतीकवादाची मांडणी सिध्दांत रुपाने करता येईल.

तसेच बहुसंख्याकांनी आपली संस्कृती श्रेष्ठ आहे असे समजुन अंतिमता आपली भाषा, संस्कृती यांचा पुरस्कार अल्पसंख्याकांनी करावा असे मत त्यांच्यावर लादने व अल्पसंख्याकांच्या मनात बहुसंख्याकांविषयी कायम भितीची व असुरक्षीतेची भावना वाढीस लागणे हे चांगल्या राष्ट्रवादाच्या दृष्टीने योग्य नाही. त्यामुळे असा बहुसंस्कृतीवाद हा न जोपसता अल्पसंख्याक आणि बहुसंख्यांक यांनी सांस्कृतीक स्वांतत्र्याचा अधिकार उपभोगत असताना समाजामध्ये शांतता, सामंजस्य व सलोखा निर्माण करुन बधुंतेच्या भावनेने राष्ट्रीय एकता आणि अखंडता या दृष्टीने राष्ट्रीय एकात्मता जोपासण्यासाठी महत्वाचे आहे. हे राष्ट्रवादाला पोषक आहे.

✲ **Referencess :-**

1) Hoffman John, Graham Paul, ***"Introduction to political Therory",*** Pearson Education ltd, Published by Dorling Kindersley, India,2006.

2) Parekh Bhikhu.C, ***"Rethinking Multiculturalism:Culutural Diversity and Political Theory"***, Macmillan Press Ltd, First United Kingdom publication, Harvard University Press, Cambridge-2000.

3) Kymlicka will, ***"Liberalism, Community and culture"***, Oxford University Press, first published Briten – 1989.

4) Kymlicka will, ***"Multicultural - Citizenship : A liberal Theory of Minority Rights"*** Oxford University Press, First Pub.New York, 1995.

5) Raza syed Ali, ***"About Religious Interfaith and Harmony Multiculturilism"***, peace full Glogal trust, village A cahal park, Gulberge II, Lahore, Pakistan.

6) Song Sarah, ***"Justice,Gender and the Politics of Multiculturalism"***, Cambridge 2007.

7) Batra Pooja, ***"Multiculturalism Education,"*** A mittal Publication, First edition, Daryaganj, New Delhi. 2004.

8) Mckinnon Catriona (edi), ***"Issues in political Theory,"*** Oxford University Press, United States, New York -2009.

9) गायकवाड प्रदीप (संपा), ***"भारताचे संविधान"*** दीक्षाभूमी संदेश, दुर्गा ऑफसेट, दहावी आवृत्ती, लष्करीबाग, नागपूर - २००६.

10) चौसाळकर अशोक, यांचे अप्रकाशित व्याख्यान.

11) क्षीरसागर राजश्री, यांचा वृत्तपत्रातील लेख.